उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय
'वनभवन' , गोडोली रोपवाटीका, सातारा ४१५ ००१
☎ (०२१६२)२२००५८, फॅक्स : (०२१६२) २२००५९ ईमेल : forest.satara68@gmail.com

विषय :- वनजमीन-सातारा
पोलादपूर-महाबळेश्वर-पावणी-वाई रस्ता
राजमार्ग १३९ कि.मी. ४३/३८० ते
वेण्णालेक रस्ता व लहान पुल बांधणेसाठी
लागणा-या ०.५१ हे. वनजमिनीबाबत.

जा.क्र.व/जमीन/१७-१८/ ३२६८
सातारा. दिनांक :- १५/११/२०१७

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग
सातारा

संदर्भ :- १) इकडिल क्र. व/जमीन/प्र.क्र.१७/६/२३२४ दिनांक १२.९.२०१७
२) आपलेकडिल क्र. लेखा/९९२३ दिनांक १५.९.२०१७ रामकक्ष क्र. प्रकल्प-१/१०४९३ दिनांक ३.१०.२०१७
३) इकडिल क्र. अ/जमीन/प्र.क्र.१७/६/ ७०२ दिनांक १३.१०.२०१७
४) इकडिल क्र. व/जमीन/३१६८ दिनांक १०.११.२०१७

दिनांक ०६.११.२०१७ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा), कोल्हापूर व नोडल ऑफिसर नागपूर यांचेकडे या कार्यालयाकडून दूरध्वनीवरुन विचारणा केली असता, प्रकरणी संदर्भिय क्र. १ अन्वये केंद्र शासनाचे अटीनुसार पर्यायी वनिकरणासाठी भराव्या लागणा-या रक्कमेमध्ये नविन रेडिरेकनरप्रमाणे रक्कम दर्शविणे आवश्यक आहे. संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये केंद्र शासनाचे अटीनुसार पर्यायी वनिकरणासाठी भराव्या लागणा-या रक्कमेचा नविन रेडिरेकनरमधील दराने भराव्या लागणा-या रक्कमेचा सुधारित तपशिल आपणास कळविणेत आला होता. तथापि टंकलेखनातील नजरचुकीमुळे परिमाण व प्रति हे. दर चुकीचा दर्शविला गेलेने खालील दिलेल्या सुधारित दराप्रमाणे रक्कम भरणा करणेस विनंती आहे.

| अ.क | तपशिल | परिमाण हे. | दर | रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पर्यायी वनिकरण (अट क्र. २) | १ हे. | ४९६५२३/- प्रति हेक्टरी | ४९६५२३/- | रेडीरेकनरप्रमाणे |
| २ | नक्त मूल्य किंमत (Net Present Value) (अट क्र. ४ प्रमाणे) | ०.५१ हे. | ७३००००/- प्रति हेक्टरी | ३७२३००/- | शासन निर्णयाप्रमाणे |

तरी वरीलप्रमाणे सुधारित प्रपत्राप्रमाणे भराव्या लागणा-या रक्कमेचा भरणा तात्काळ NEFT व्दारे करुन त्याप्रमाणे या कार्यालयास आंग्ल भाषेतील अहवालासह पूर्तता अहवाल सादर करणेस विनंती आहे. केंद्र शासनाने दंडात्मक पर्यायी वनिकरण रक्कम भरणा करण्यास कळविले तर सदर रक्कम आपणास भरणा करावी लागेल तसेच सदर प्रकल्पांतर्गत ४५ वृक्षांची तोड करावी लागणार आहे त्यासाठी लागणारी रक्कम अलाहिदा कळविणेत येत आहे. सदर रक्कम उपवनसंरक्षक सातारा (Deputy Conservator of Forests.Satara ) यांचे नावे डिमांड ड्राफ्टने जमा करावयाची आहे याची नोंद घ्यावी ही विनंती.

(अ.मो.अंजनकर)
उपवनसंरक्षक
सातारा वन विभाग सातारा

प्रतिलिपी :- मुख्य वनसंरक्षक (प्रादे.) कोल्हापूर यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

Scanned by CamScanner